भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०१/२०१७

**१) दारू पिवुन भांडण करून विटाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २६/०१/२०१७ चे २२.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी सुनिल सोमाजी उरकुडे वय ५२ वर्ष, रा. मेंढा भंडारा हे त्यांचे राहते घरी बिछाना टाकुन त्यावर बसुन जेवण्याकरिता ताट घेतला असतांना त्याचा मानलेला मुलगा आरोपी याने दारू पिवुन बबड करून फिर्यादी सोबत भांडण करून माझे घरी राहु नकोस असे बोलुन फिर्यादी हा दरवाजा जवळ उभा असंताना आरोपीने त्याचे डाव्या कानाचे वर, डोक्यावर विट मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) निष्काळजीपने वाहन चालवुन दोन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०१/२०१७ चे १८.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी सौ. राधीका मुकुंदा ठवकर वय ४५ वर्ष रा. खैरी ही व तिचा पती मुकुंदा सखराम ठवकर वय ५५ वर्ष, ननद गिता रवीद्र ठवकर वय ४४ वर्ष रा.गांगला सह शेतावरून भाजीपाला घेवुन रोडाने घराकडे येत असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, हयगयीने ,लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादी, तिचा पती व ननद यांना धडक मारून जखमी केरण्यास कारणीभुत होवुन पो.स्टे. ला माहीती न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४/१३४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) तनशीचे ढिगाजवळ मृत अवस्थेत इसम मिळुन आल्याने मर्ग नोंद . :—**

दिंनाक २३/०१/२०१७ रोजी चे १८.०० वा. ते २७/०/२०१७ वा. दर. यातिल मृतक शिवचंद शामजी ढोरे वय ५० वर्ष रा. लोहारा हा त्याचे पत्नीसह शेतावर गेला असता तो रात्री घरी परत आला नाही, त्याचे गावाशेजारी व नातेवाईकात शोध घेतला असता मिळुन आला नाही म्हणुन त्याचे स्वत:चे शेतात जावुन पाहणी केली असता, शेतात असलेल्या तनशीचे ढिगाजवळ मृतक हा मृता अवस्थेत मिळुन आला मृतक हा दारू पिण्याचे सवयीचा असल्याने अतीदारूचे सेवनामुळे मृतकचा मृत्यु झाला असावा असे फिर्यादी शिवराम शामजी ढोरे वय ४० वर्ष रा लोहारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो. स्टे. आधंळगाव हे करीत आहे.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक २७/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, तुमसर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी दारु किमती १,२७०/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २७/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैधप्रवासी वाहतुक ०१ केसेस ,तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.